**परवानगी वर्ष :-२०१६-२०१७**
**माध्यम : इंग्रजी**
**स्वंयअर्थ सहाय्यित शाळा -कायम विना अनुदानित**
**(इंग्रजी दर्जावाढ)**

**जा.क.शिउसं/माध्य-३/१२/प्र.मा./पुवि/२०१६** 20805
**शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,**
**पुणे-१ यांचे कार्यालय**
**दिनांक : -**

**प्रति,**

**शिक्षणाधिकारी (माध्यमिक),**
**जिल्हा परिषद, पुणे**

**विषय : स्वयंअर्थ सहाय्यित शाळेस प्रथम मान्यता मिळणेबाबत. . .**
विब्स पब्लिक स्कूल, पेंन्डसे कॉलनी किवळे, पुणे

संदर्भ : १. आपले पत्र क्र. जि.प./शिक्षण/माध्य/नवीन शाळा/५५८०/१६ दिनांक २३/९/२०१६
**२. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्रं.१, ६ व २४) २०१२**
**३. शासन निर्णय क्रं.एसएफएस-२०१६/प्र.क्र.६९/भाग-१/एसएम-२ दिनांक १७ जून २०१६**
**४. या कार्यालयाचे पत्र क्रं. शिउसं/माध्य-३/१२/स्वयंअशाळा/मान्यता/पुवि/२०१६ /१६४०८-११ दिनांक १९/७/२०१६**

वरील संदर्भिय पत्रान्वये कळविण्यांत येते की, माध्यमिक शाळा संहिता नियम ३.१, ३.२ व ३.३ अन्वये श्री शंकर एज्युकेशनल टुरिष्ट किवळे, पुणे संचलित विब्स पब्लिक स्कूल, पेंन्डसे कॉलनी किवळे, पुणे माध्यमिक शाळेच्या इयत्ता ९ **वी व १० वी च्या** च्या वर्गास **२०१६-२०१७** या शैक्षणिक वर्षासाठी **जून २०१६** पासून प्रथम मान्यता देण्यात येत आहे. सदर मान्यता खालील अटींची पूर्तता अधिन राहून देण्यांत येत आहे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी खालील अटींची पूर्तता शाळा करित आहे किंवा कसे याची तपासणी करुन पुढील मान्यतेच्या वेळी प्रस्ताव पाठवितांना खालील अटी पूर्ण केलेल्या आहेत किंवा कसे याची तपासणी करुन पुढील मान्यतेच्या वेळी प्रस्ताव पाठवितांना खालील अटी पुर्ण केलेल्या आहेत किंवा कसे याबाबतही अहवाल प्रस्तावासोबत पाठविण्यांत यावा.

१. प्रस्तुत प्रकरणी बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम,२००९ मधील तरतुदींचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्यावी.
२. माध्यमिक शाळा संहिता नियम क्रमांक ३(२),४८ तसेच ८३ मधील सर्व तरतुदींचे काटेकोरपणे पालन करावे
३. विहित निकषानुसार शिक्षक कर्मचारी यांची नियुक्ती करावी.
४. संच निश्चिती व कर्मचारी मान्यता दरवर्षी करुन घेण्यात यावी.
५. शैक्षणिक शुल्क विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन आकारण्यात यावी.
६. विहित संख्येच्या मर्यादेत विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावेत.
७. शासनाचे वेळोवेळी दिलेले आदेश, सूचना यांचे पालन करणे बंधनकारक राहील.
८. सदरची प्रथम मान्यता ही तात्पुरत्या स्वरुपाची असून पाच वर्षांच्या कालावधीनंतर कायमपणे मान्यता देण्याचा या कार्यालयाकडून विचार करण्यात येईल.मात्र शाळेने, संस्थेने माध्यमिक शाळा संहिता नियम क्रमांक ३ मध्ये घालून दिलेल्या शर्ती पूर्ण करणे चालू ठेवले पाहिजे.
१०. संस्थेने शाळा परवानगीसाठी विहित केलेले माध्यम व शाळेचे ठिकाण इत्यादींमध्ये भविष्यात कोणतेही बदल करता येणार नाही.
११. शासनाने ज्या ठिकाणी परवानगी दिलेली आहे. त्या ठिकाणी व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.
१२. अधिनियमातील तरतुदींनुसार शाळा स्थापन करण्यास दिलेली परवानगी शैक्षणिक वर्ष **२०१६-१७** पासून असेल.
१३. शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये ज्या वर्गास परवानगी दिलेली आहे त्या वर्गा व्यतिरिक्त इतर वर्ग चालू करता येणार नाहीत.
१४. परवानगी देण्यात आलेल्या नविन शाळा यांना शासनाच्या वेळावेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ व महाराष्ट्र स्वंय अथसहाय्यित शाळा (स्थापन व विनियमन) मुख्य -अधिनियम २०१३ मधील सर्व तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहील.